झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
Email : info@sra.gov.in

क्र. झोपुप्रा/उजि/कार्या-२/टे/डी-२/२०१०/ 2432

1 - OCT 2010

परिपत्रक :- ११८

**विषय :- परिशिष्ट-२ पारित करणेची कालमर्यादा निश्चित करणेबाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या योजनांचा आढावा घेतला असता विविध सक्षम प्राधिका-यांकडे ५०० प्रकरणे परिशिष्ट-२ पारित करणेकरीता प्रलंबित असून त्यापैकी २७० प्रकरणे २००३ ते २००८ च्या कालावधीतील असल्याचे दिसून आले.

तरी झोपडपट्टी पुनर्वसन योजना जलदगतीने पुर्ण करणेसाठी योजना लवकरात लवकर कार्यान्वीत होण्याच्या दृष्टीने परिशिष्ट-२ पारित होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. झोपुयो१०९७/प्रक्र.४५१५/झोपुसू-१, दि. १४/०५/१९९८ मधील क्र. ५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारान्वये मी खालील प्रमाणे कालावधी निश्चित करीत आहे.

| अनु . क्र. | झोपडयांची संख्या | परिशिष्ट -२ पारीत करण्याबाबतचा कालावधी |
|---|---|---|
| १ | ० ते ५०० | ४ महिने |
| २ | ५०० ते १००० | ६ महिने |
| ३ | १००० व त्यावरील | ८ महिने |

उपरोत कालावधीनुसार सबंधित सक्षम प्राधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाकडील प्रलंबित परिशिष्ट-२ पारित करण्याची कार्यवाही पूर्ण करुन प्राधिकरणाकडे परिशिष्ट-२ पाठविणेत यावे. उपरोक्त कालावधी नुसार परिशिष्ट-२ पारित न केल्यास नियमानुसार कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.**

प्रत :-

माहिती व उचित कार्यवाहीसाठी:-

१. मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, म्हाडा, मुंबई.

२. अप्पर जिल्हाधिकारी [अति/निष्का], पश्चिम उपनगरे/पूर्व उपनगरे/मुंबई शहर
३. उपजिल्हाधिकारी [अति/निष्का], बांद्रा/अंधेरी/बोरीवली /मालाड/ धारावी/कुलाबा /चेंबूर/भांडूप/ घाटकोपर / मुलुंड.
४. सर्व सहाय्यक महापालिक आयुक्त बृहन्मुंबई महानगर पालिका.